# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२६

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१) २७२५ (१८-०७-२०२५) श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाविद्यालयांना नॅक मूल्यांकनामध्ये चांगला दर्जा प्राप्त व्हावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे तसेच मुलांना मिळणारे शिक्षण उच्च दर्जाचे असावे असा शासनाचा प्रयत्न असूनही बहुतांशी महाविद्यालयांमध्ये शिक्षकांच्या जागा रिक्त असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महाविद्यालयांमधील पूर्ण वेळ शिक्षकांच्या किती जागा रिक्त आहेत, तसेच शासनाने निर्णय घेऊन या रिक्त जागा भरणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे तसेच या रिक्त जागा कधीपर्यंत भरण्यात येणार आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (३०-०१-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील दिनांक ०१/१०/२०१७ रोजीच्या विद्यार्थी संख्येवर आधारीत अनुज्ञेय असलेल्या एकूण ३११८५ पदांपैकी सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील ११०८७ पदे रिक्त होती. सदर पदांपैकी ३५८० पदे भरण्यासाठी शासन निर्णय दिनांक ०३/११/२०१८ व दिनांक १२/११/२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार वित्त विभागाच्या सहमतीने मान्यता प्रदान करण्यात आलेली होती. त्यानुसार दिनांक २६/०९/२०२५ पर्यंत पदभरतीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र प्रस्ताव सादर केलेल्या महाविद्यालयातील ३०८६ पदे भरण्यात आलेली आहेत व उर्वरीत ४९४ पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सद्य:स्थितीत वित्त विभागाने सहायक प्राध्यापक संवर्गात रिक्त असलेली ५०१२ इतकी पदे भरण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने विहित प्रक्रियेचा अवलंब करुन पदभरतीची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती विभागातील उच्च माध्यमिक शाळा / तुकड्यांच्या वितरीत झालेल्या संच मान्यतेत आकारण्यात आलेला शिक्षार्थ कपाती रद्द करणेबाबत

**(२) २८८१ (१८-०७-२०२५) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.शिक्षण उपसंचालक अमरावती विभाग अमरावती यांनी सन २०२४-२५ च्या उच्च माध्यमिक शाळा /तुकड्या वितरीत झालेल्या संच मान्यतेमध्ये ज्या तुकडीमध्ये ५० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या आहे तेथे सरसकट शिक्षार्थ कपाती लावण्यात आली असल्याची बाब माहे मे २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास दिनांक १० फेब्रुवारी २०२० च्या शासन निर्णयानुसार किमान आवश्यक सरासरी हजेरी ३० किंवा त्यापेक्षा कमी व त्यामध्ये किमान १५ मुली असल्यास ५ हजार रुपये शिक्षार्थ कपात लागते हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०१-२०२६) :** (१) व (२) शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय दिनांक १४/१२/१९९० मध्ये ग्रामीण व शहरी भागातील उच्च माध्यमिक /कनिष्ठ महाविद्यालयामध्ये अपेक्षित विद्यार्थी संख्या व आवश्यक सरासरी उपस्थितीनुसार शिक्षार्थ कपातीची तरतूद आहे. तसेच शासन निर्णय दिनांक १०/०२/२००० मध्ये ग्रामीण भागातील उच्च माध्यमिक वर्गातील मुलींची संख्या व सरासरी हजेरी क्षमापित करुन शिक्षार्थ कपातीसह अनुदानास पात्र करणेबाबत तरतुद आहे.

वरीलप्रमाणे शासन निर्णयातील तरतुदींचा विचार करुन अमरावती विभागातील किमान आवश्यक सरासरीची अट पूर्ण न करणाऱ्या उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शिक्षार्थ कपातीची कार्यवाही करण्यात आली आहे व त्यानुसार संचमान्यता सन २०२४-२५ मध्ये तसे नमुद करुन संचमान्यता निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

---

## विदर्भातील दिंदोडा प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

**(३) ३७७२ (१८-०७-२०२५) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील दिंदोडा प्रकल्पग्रस्तांनी त्यांच्या संपादित केलेल्या जमिनीस सन २०१३ च्या कायदयानुसार मोबदला मिळण्यासाठी धरणाच्या कामास विरोध करुन आंदोलनाच्या माध्यमातून धरणाचे काम माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान बंद पाडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शेतकऱ्यांना अतिशय अल्प मोबदला दिला असून तो शेतकऱ्यांना/धरणग्रस्तांना मान्य

नाही, याबाबत दिंदोडा प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती व शासनाच्या अधिकाऱ्यांनी मोबदला देण्याबाबत प्रस्ताव तयार करुन शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रस्तावाचे स्वरुप काय आहे व त्याप्रमाणे प्रकल्पग्रस्तांना मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२८-०१-२०२६) :** (१) होय,
(२) व (३) दिंदोडा प्रकल्पाच्या भुसंपादनाकरीता भुसंपादन कायदा-१८९४ नुसार रुपये ५७,००० ते १,२८,००० प्रती हेक्टरी दराने रुपये १२.१६ कोटी मोबदला सन १९९५ ते २००२ मध्ये महसूल विभागामार्फत अदा करण्यात आलेला आहे. तद्नंतर, न्यायालयात गेलेल्या भुधारकांना वाढीव मोबदला पोटी कलम १८ व २८ अंतर्गत रुपये १२.७० कोटी इतका मोबदला सन २००५ ते २०१५ मध्ये अदा करण्यात आलेला आहे. सदरची रक्कम ही अत्यल्प असल्यामुळे संघर्ष समितीने आंदोलन केले होते. त्यानुषंगाने ३.१० लक्ष प्रति हेक्टर याप्रमाणे रुपये ३४.०० कोटीचे सानुग्रह अनुदान एप्रिल, २०१८ मध्ये मंजूर करण्यात आले असून त्याचे वितरण करण्यात आले आहे.

वरीलप्रमाणे दिंदोडा प्रकल्पग्रस्तांना भुसंपादन कायदा-१८९४ अंतर्गत मूळ मोबदला तसेच कलम १८ व २८ अन्वये वाढीव मोबदला व या व्यतिरिक्त ३४ कोटी रुपयांचे सानुग्रह प्रदान करण्यात आले असून या प्रकारे त्यांना संपादन करण्यात आलेल्या जमीनीसाठी यापुर्वीच रास्त मोबदला देण्यात आलेला आहे.
'नविन भुसंपादन कायदा - २०१३ मध्ये पुर्वी संपादन करण्यात आलेल्या जमिनीसाठी वाढीव मोबदला देण्याची कोणतीही तरतुद नाही.

सबब, दिंदोडा प्रकल्पग्रस्तांची नव्याने २४० कोटी रुपयांचे सानूग्रह द्यावे हि मागणी, या अगोदर सर्व संबंधित भुधारकांना संपादीत जमिनीसाठी योग्य मोबदला प्रदान करण्यात आला असल्याने तसेच नविन भुसंपादन कायदा-२०१३ च्या कायद्यामध्ये चालु दरानुसार पुर्वी संपादीत झालेल्या जमिनीकरीता मोबदला देण्याची तरतुद नसल्याने, अमान्य करण्यात येत आहे व या संदर्भातील वाढीव मागणीचे प्रस्ताव शासनास सादर असल्यास ते रद्द समजण्यात यावे.'
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आर्वी (जि.वर्धा) येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय मंजूर करणेबाबत

**(४) ४००० (१८-०७-२०२५) श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी (जि.वर्धा) येथे एकही शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय नसल्यामुळे या ठिकाणी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय मंजूर करणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री व मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना दिनांक २८ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला असून शासकीय तंत्रनिकेतन आर्वी इथे मुला-मुलींकरीता वसतिगृहाची सुविधाही उपलब्ध आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक २८ मे, २०२५ रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने आर्वी येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०४-०२-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे. आर्वी, जि.वर्धा येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय नव्याने स्थापन करण्याचे निवेदन श्री.दादाराव केचे, मा.वि.प.स. यांनी दिनांक ०८/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मा.उप मुख्यमंत्री यांना आणि दिनांक १३/१०/२०२५ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री आणि मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांना दिलेले आहे.

(२) हे खरे आहे. शासकीय तंत्रनिकेतन, आर्वी येथे विविध पदविका अभ्यासक्रमासाठी दरवर्षी सरासरी १००० पेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित असतात. या पदविका संस्थेच्या परिसरात मुलांकरीता १ (प्रवेश क्षमता १००) व मुलींकरीता २ (एकूण प्रवेश क्षमता १०८) वसतिगृह आहेत. सदर वसतिगृहात उपलब्ध असलेल्या जागांची क्षमता ही पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांसाठीच अपूरी आहे, त्यामुळे नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मागणीच्या अनुषंगाने पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांची सदर वसतिगृहात व्यवस्था होणे शक्य नाही.

(३) मा.विधान परिषद सदस्य यांच्या मागणीच्या अनुषंगाने, आर्वी, जि.वर्धा येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याबाबत सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांनी स्थापन केलेल्या अभ्यासगटाचा अहवाल संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय यांनी दिनांक ०९/०८/२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सदर अहवालानुसार, आर्वी पासून ५० कि.मी. अंतरावर अमरावती, ८० कि.मी. अंतरावर यवतमाळ आणि १०० कि.मी. अंतरावर नागपूर येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत, तसेच, सद्य:स्थितीत वर्धा जिल्ह्यात असलेल्या एकूण ६ अभियांत्रिकी महाविद्यालयात मागील तीन वर्षात एकूण प्रवेश क्षमतेच्या ३० ते ३५ टक्के जागा रिक्त राहत आहेत, यासारख्या वस्तुस्थितीदर्शक बाबी विचारात घेता, मौजे आर्वी, ता.आर्वी, जि.वर्धा येथे नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सद्य:स्थितीत सुरु करणे संयुक्तीक होत नसल्याने, त्याबाबतच्या प्रस्तावास शासनाची मान्यता देण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत

**(५) ४७३० (१४-१२-२०२५) श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ४४९ ला दिनांक ७ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेला दिनांक ३ ऑक्टोबर, २०२५ रोजी अभिजात दर्जा मिळून एक वर्ष पूर्ण झाले असले, तरी देखील केंद्र सरकारने अद्यापही अभिजात दर्जाचे लाभ व नियम याबाबतचा शासन निर्णय जाहीर केलेला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, यासंदर्भात गत वर्षभरात राज्य शासनाने केंद्र शासनाकडे किती वेळा पाठपुरावा केला आहे,

(३) असल्यास, तदनुषंगाने केंद्र शासनाने याबाबतचा शासन निर्णय जाहीर करण्याबाबत आजमितिपर्यंत कोणती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१३-०१-२०२६) :** (१) व (२) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर ज्या भाषांना यापूर्वी अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे, त्यांच्याकडून पुढील कार्यवाहीसाठी मार्गदर्शन मिळावे यासाठी विभागाच्या शिष्टमंडळाने उच्च शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली येथे भेट दिली असता त्यांनी म्हैसूर येथील केंद्रीय भारतीय भाषा संस्थेला (CIIL) भेट द्यावी असे सुचविले. त्यानुसार म्हैसूर येथील संस्थेसही विभागाच्या शिष्टमंडळाने भेट दिली.

या भेटीदरम्यान राज्याचे अध्ययन उत्कृष्टता केंद्र (Centre of Excellence) असणे अनिवार्य असल्याचे समजले. त्यानुसार दिनांक १५/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये राज्यामध्ये अध्ययन उत्कृष्टता केंद्र (Centre of Excellence) स्थापनेचा प्रस्ताव केंद्रशासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. दरम्यान विभागाच्या शिष्टमंडळाने पुन्हा शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली येथे व्यक्तीश: भेट देऊन याबाबचा पाठपुरावा केला.

मा.मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने उच्च शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांना स्मरणपत्र देण्याचे प्रस्तावित आहे.

(३) ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात मराठी भाषा संवर्धनासाठी राज्यस्तरीय संस्था उभारुन धोरण निश्चिती करण्याबाबत

**(६) ४८१४ (२२-१२-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठीला भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होऊन एक वर्ष पूर्ण झाले असतानाही राज्यात ‘सेंटर ऑफ एक्सलन्स’ ची स्थापना, विद्यापीठांमध्ये अध्यासने आणि राष्ट्रीय पुरस्कार इ. बाबत अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसून सदर आश्वासने पूर्ण होण्याकरीता केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात राज्य शासनाकडून दिरंगाई होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर राज्यांनी त्यांच्या भाषांसाठी स्वतंत्र संस्था उभारल्या असताना राज्य शासन याकरीता केवळ केंद्र शासनाच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आश्वासनांची अंमलबजावणीसाठी व मराठीच्या संवर्धनासाठी राज्यस्तरावर संस्था उभारण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.उदय सामंत (१३-०१-२०२६) :** (१), (२) व (३) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर ज्या भाषांना यापूर्वी अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे, त्यांच्याकडून पुढील कार्यवाहीसाठी मार्गदर्शन मिळावे यासाठी विभागाच्या शिष्टमंडळाने उच्च शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली येथे भेट दिली असता त्यांनी म्हैसूर येथील केंद्रीय भारतीय भाषा संस्थेला (CIIL) भेट द्यावी असे सुचविले. यापूर्वी ज्या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे त्यातील काही भाषांचे अध्ययन उत्कृष्टता केंद्र (Centre of Excellence) हे केंद्रीय भारतीय भाषा संस्था, म्हैसूर येथेच कार्यरत आहेत. त्यानुसार म्हैसूर येथील संस्थेसही विभागाच्या शिष्टमंडळाने भेट दिली.

तथापि, अभिजात मराठी भाषेचे प्रकल्प कामकाज केंद्र शासनाच्या सहयोगाने पुढे न्यायचे असेल तर राज्याचे अध्ययन उत्कृष्टता केंद्र (Centre of Excellence) असणे अनिवार्य आहे. आणि त्याचमुळे दिनांक १५/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये राज्यामध्ये अध्ययन उत्कृष्टता केंद्र (Centre of Excellence) स्थापनेचा प्रस्ताव केंद्रशासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. तद्नंतर मा.मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने उच्च शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांना स्मरणपत्र देण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दक्षिण-पूर्व नागपूर येथील जलतरण तलावाचे नूतनीकरण करुन सार्वजनिक स्वरूपात खुला करण्याबाबत

**(७) ४८८६ (२२-१२-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलतरणपटूंना घराजवळ नियमित सरावाकरीता नागपूर (दक्षिण-पूर्व) मधील रघुजीनगर येथील कामगार कल्याण केंद्रात बांधण्यात आलेला जलतरण तलाव माहे मार्च, २०२० मध्ये बंद करण्यात आला असून सदर तलाव दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजीच्या शासन मान्यतेनुसार देखभाल दुरूस्ती करण्यासाठी अजुनही अंतिम टप्प्यात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तलाव सार्वजनिक स्वरूपात खुला न केल्यामुळे जलतरणपटू सरावापासून वंचित असल्यामुळे या भागातील शेकडो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जलतरणपटूंमध्ये निराशा पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू तलावाचे नूतनीकरण तातडीने करुन तलाव सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व तलावाच्या नूतनीकरणाच्या कामास विलंब करणाऱ्यावर संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (०४-०२-२०२६) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.
कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर शासन निर्देशानुसार १३ मार्च २०२० पासून सदर जलतरण तलाव बंद करण्यात आला होता.सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर जलतरण तलावाचे दुरुस्ती काम जून २०२३ ते जूलै २०२५ या कालावधीत पूर्ण करण्यात आले आहे.
(२) व (३) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सदर जलतरण तलावाचे दुरुस्ती / नूतनीकरण कामे जून २०२३ ते जूलै २०२५ या कालावधीत पूर्ण करण्यात आलेले आहे. शासनाने दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी या जलतरण तलावाच्या देखभाल व संचालन कामासाठी एजन्सी नियुक्तीकरीता मान्यता दिली असून त्यानुषंगाने ई निविदा प्रक्रियेसाठीची प्राथमिक कार्यवाही पूर्ण करून ई निविदा प्रसिध्द करण्यासाठी मंजूरी मिळणेबाबतचा प्रस्ताव उप सचिव (काम १०) तथा महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांना दिनांक ०२ जानेवारी २०२६ रोजी सादर केलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा परिषद शाळांमधील आंतरजिल्हा बदली प्रक्रियेतील सदोष पध्दतीमुळे अनेक शिक्षक बदलीपासून वंचित असल्याबाबत

**(८) ४९४२ (१४-१२-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.विक्रांत पाटील, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर, श्री.अरुण लाड, श्री.संदीप जोशी, श्रीमती चित्रा वाघ, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत प्राथमिक शिक्षकांची दरवर्षी राबविण्यात येणारी संगणकीय बदली प्रक्रिया मागील तीन वर्षापासून प्रलंबित असल्याने स्वगृह जिल्ह्यापासून शेकडो किलोमीटर अंतरावर कर्तव्य बजावणारे १२ हजार शिक्षक अंतर जिल्हा बदलीच्या प्रतिक्षेत असून सदरहू बदली प्रक्रिया तातडीने सुरू करण्यासाठी अनेक शिक्षक संघटनांनी मा.मंत्री, ग्रामविकास महोदयांकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू संगणकीय बदली प्रक्रिया प्रलंबित राहण्यामागील कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर बदली प्रक्रिया तातडीने सुरू करून उक्त बदलीच्या प्रतिक्षेत असलेल्या शिक्षकांना न्याय देण्याबाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२९-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सन २०२५-२६ च्या संचमान्यतेनुसार सर्व जिल्हा परिषदांकडून अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करुन बिंदुनामावल्या अद्ययावत झाल्यानंतर प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार आंतरजिल्हा बदली प्रक्रिया कार्यान्वित करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मुख्याध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(९) ५०७१ (२१-११-२०२५) श्री.संजय खोडके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या १५७२ शाळांपैकी तब्बल १४२५ शाळांमध्ये मुख्याध्यापकच नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्याध्यापक हे केवळ प्रशासकीय प्रमुख नसून, शाळेच्या प्रत्येक घटकाला जोडणारा केंद्रबिंदू असून शिक्षण, शिस्त, व्यवस्थापन आणि गुणवत्ता यांचा गाभा त्यांच्या नेतृत्वावर अवलंबून असतो, परंतु अमरावती जिल्ह्यात फक्त १४७ मुख्याध्यापक कार्यरत असून उर्वरित सर्व शाळांमध्ये हे काम प्रभारी शिक्षकांकडे सोपविले गेले असल्याचे तसेच १०० विद्यार्थी संख्येच्या ३०९ शाळांमध्ये स्वतंत्र मुख्याध्यापक असणे बंधनकारक असताना केवळ ४५५ मुख्याध्यापकांची पदेच भरली नसल्याचे

निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुख्याध्यापक नसलेल्या शाळेत विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देणारा कोणीच नसल्यामुळे शासनाने मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी यांची पदे भरण्याची कार्यवाही करावी अशी मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी यांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (०८-१२-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत जिल्हा परिषदेच्या १५७२ शाळा आहेत. संचमान्यता सन २०२४-२५ नुसार मुख्याध्यापकांची एकूण २०४ पदे मंजूर असून १४९ पदे भरलेली आहेत. शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक ०९/१०/२०२४ मधील तरतुदीनुसार प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या इ.१ ली ते ४/५ वी व इ.१ ली ते इ.७/८ वी या गटाकरीता १५० पटसंख्येस मुख्याध्यापकांचे १ पद मंजूर आहे. या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पूर्वीच्या मंजूर पदास संरक्षण देण्यासाठी उपरोक्त गटांकरीता किमान विद्यार्थी संख्या १०० ठेवण्यात आली आहे. तसेच इ.६ ते ८ या गटांकरीता १०० पटसंख्येस मुख्याध्यापकांचे १ पद ठेवण्यात आलेले असून पूर्वीच्या मंजूर पदास संरक्षण देण्यासाठी किमान विद्यार्थी संख्या ९० ठेवण्यात आली आहे. त्यामुळे उर्वरित शाळांमध्ये सेवाजेष्ठ शिक्षकाकडे मुख्याध्यापक पदाची तात्पुरती जबाबदारी दिलेली आहे.
(३) अशा स्वरुपाची मागणी आहे.
(४) जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत दिनांक ०३/०४/२०२५ रोजी रिक्त पदी पदोन्नती प्रक्रिया राबविण्यात आली असून त्यामध्ये खालील पदे भरण्यात आलेली आहेत.

१. विस्तार अधिकारी श्रेणी २ - ६ पदे
२. विस्तार अधिकारी श्रेणी ३ - ४ पदे
३. केंद्रप्रमुख - २५ पदे
४. मुख्याध्यापक मराठी माध्यम - ९२ पदे
५. मुख्याध्यापक उर्दु माध्यम - २३ पदे

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानाची अंमलबजावणी करुन निकष ठरविण्याबाबत

**(१०) ५३०९ (१४-१२-२०२५) श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ग्रामविकासाच्या योजनांमध्ये कोणतेही गाव मागे राहू नये, यासाठी मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान सुरु करण्यात आले असून त्यांतर्गत राज्यातील २८ हजार ग्रामपंचायती व ४० हजार गावे मॉडेल म्हणून विकसित करण्यात येणार असल्याचे दिनांक १७ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभियान केव्हापासून राबविण्यात येणार आहे व त्याबाबतचे निकष काय आहेत तसेच देण्यात येणाऱ्या पारितोषिकाची रक्कम कशाप्रकारे देण्यात येणार आहे,
(३) असल्यास, सदर अभियानाच्या अंमलबजावणीची होण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे काय, असल्यास त्याची सद्य:स्थिती काय आहे.

**श्री.जयकुमार गोरे (२९-०१-२०२६) :** (१), (२) व (३) सदर अभियानाचा शुभारंभ दिनांक १७/०९/२०२५ रोजी झालेला आहे. सदर अभियानाचे निकष ग्रामविकास विभागाच्या दिनांक ०६/०८/२०२५ रोजीच्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ" प्रमाणे आहेत. या अभियानांतर्गत पुरस्काराची रक्कम अदा करण्याकरीता संबंधित जिल्हा परिषदेला निधी वितरीत करण्यात येणार आहे. सदर अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणी करीता शासनस्तरावरून आवश्यक ती कार्यवाही सुरू आहे.

---

## रायगड जिल्हा परिषदेत विविध विभागांतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(११) ५३७० (१४-१२-२०२५) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.विक्रांत पाटील, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हा परिषदेत एकूण ११,५५५ पदांपैकी २,६०९ पदे रिक्त असल्यामुळे सध्या कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण असून यामुळे कामकाजाला गती देण्यासाठी ही पदे लवकरात लवकर भरण्याची मागणी होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्हा परिषदेचा कारभार गेल्या ३ वर्षांपासून प्रशासक चालवित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विकासाला गती देण्याच्या दृष्टीने उक्त रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२९-०१-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे. रायगड जिल्हा परिषद अंतर्गत, सरळसेवा कोट्यातील गट-क संवर्गांची एकूण मंजूर पदे ८८६१ असून त्यापैकी ७३७७ पदे भरलेली असून १४८४ पदे रिक्त आहेत व पदोन्नती कोट्यातील एकूण मंजूर पदे १०२० असून त्यापैकी ६८० पदे भरलेली व ३४० पदे रिक्त आहेत.

तसेच, सरळसेवा कोट्यातील गट-ड संवर्गांची ५०० पदे मंजूर असून २५८ पदे भरलेली व २४२ पदे रिक्त आहेत व पदोन्नती कोट्यातील ९१ पदे मंजूर असून २७ भरलेली व ६४ पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिनांक २०/०३/२०२२ पासून प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.
(३) माहे सन २०२३-२४ मधील जिल्हा परिषद सरळसेवा पदभरतीच्या अनुषंगाने रायगड जिल्हा परिषद अंतर्गत रिक्त ८४० पदांची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर भरती अंतर्गत विविध संवर्गातील ५६२ पदे भरण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हा परिषदेचा सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील निधी अखर्चित असल्याबाबत

**(१२) ५४४१ (१४-१२-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा परिषदेच्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पात ४१० कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पीय तरतुदी पैकी केवळ २४९ कोटी रुपये प्रत्यक्ष खर्च झाल्याने तब्बल १६० कोटी रुपये अखर्चित राहिले असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने खर्चासाठी वेळोवेळी मुदत वाढ दिली असतानाही हा निधी अखर्चित राहण्याची कारणे काय आहेत तसेच सदरहू अखर्चित राहिलेला १६० कोटी रुपयाचा निधी तात्काळ खर्च करण्यासाठी शासन पुन्हा मुदतवाढ देण्यात येणार आहे तसेच कामे मंजूर असूनही निधी खर्च न करणाऱ्या अधिकारी यांचेवर शासनाने काय कारवाई केली,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (०३-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषद स्वनिधीचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे अर्थसंकल्प रुपये ४१० कोटीचे होते. त्यापैकी रुपये २३९.८६ कोटी हे खर्चाचे अर्थसंकल्प तयार करणेत आले होते. त्यापैकी रुपये १४०.९९ कोटी खर्च करणेत आले आहे. आणि ९८.८७ कोटी अखर्चित राहीलेला आहे.

(२) जिल्हा परिषद स्वनिधी खर्चासाठी मुदतवाढीची आवश्यकता नसते. सदर अखर्चित निधी जिल्हा परिषद स्तरावर खर्च करण्यासाठी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक असते. त्यानुसार प्रशासक सल्लागार समिती सभा,जिल्हा परिषद,पुणे दिनांक १६/०७/२०२५ अन्वये पुरवणी अंदाजपत्रक तयार करुन सन २०२५-२६ मध्ये खर्चास मान्यता दिलेली आहे. त्यामुळे सन २०२४-२५ मध्ये मंजूर कामांसाठी आवश्यक तो निधी उपलब्ध झालेला आहे.

तसेच लोकसभा निवडणूक २०२४ आचारसंहिता व विधानसभा निवडणूक २०२४ आचारसंहिता असल्याने तसेच पावसाळी कालावधी माहे जूलै, २०२४ ते ऑक्टोबर, २०२४ पर्यंत असल्याने नियोजनास व खर्चास पुरेसा कालावधी न मिळाल्याने निधी अखर्चित राहिलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांकडून शुल्क नियमन प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा जादा शुल्क आकारल्याबाबत

**(१३) ५६२३ (२४-११-२०२५) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेत अनेक महाविद्यालयांकडून शासनाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा जादा रक्कम विद्यार्थ्यांकडून घेण्यात आल्या असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून विद्यार्थ्यांची व पालकांची आर्थिक लूट होत असल्याने तत्कालीन शासनाने शुल्कावर नियंत्रण ठेवण्यासाठी शुल्क नियामक प्राधिकरणाच्या (एफआरए) ची स्थापना केली हो**ती,** हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या एफआरएच्या बैठकांना राज्यातील तंत्र शिक्षण, उच्च शिक्षण विभागाचे संचालक, कृषी शिक्षण सचिव, आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलसचिव, विद्याशाखांचे उच्चपदस्थ अधिकारी तसेच अन्य संचालक हे गेल्या दोन वर्षात झालेल्या बैठकांपैकी ९० टक्क्यांपेक्षा अधिक बैठकांना म्हणजेच २०५ बैठकांना उपस्थित नव्हते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा महाविद्यालयांकडून डेव्हलपमेंट फंड, परिसर मेन्टेनन्स फी, लॅब अपग्रेडेशन फी अशा नावाखाली विद्यार्थ्यांकडून जास्त शुल्क आकारण्यात येत असल्याच्या तक्रारी दिनांक १५ ऑगस्ट,२०२५ रोजी वा त्यादरम्यान विद्यार्थ्यांकडून येत असल्याने प्रत्येक विनाअनुदानित संस्थेने अभ्यासक्रम निहाय शुल्क त्यांच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणे बंधनकारक राहणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने महाविद्यालयांच्या डेव्हलपमेंट फंड, परिसर मेन्टेनन्स फी, लॅब अपग्रेडेशन फी शुल्काबाबत सदर महाविद्यालयांवर व शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकांना गैरहजर राहणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०५-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.

महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरीता महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ अंमलात असून, त्यानुसार शुल्क नियामक प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.

(२) शुल्क नियामक प्राधिकरण संबंधितांना प्राधिकरणाच्या बैठकीकरीता उपस्थित राहण्याबाबत वेळोवेळी नोटीस निर्गमित करुन कळवत असते. सदर बैठकांसाठी उच्च पदस्थ अधिकारी उपस्थित नसल्यास, त्यांच्या तज्ञांना उपस्थित राहण्याबाबत संबंधित सदस्यांकडून कळविण्यात येते. त्यानुसार, संबंधित विषयांचे तज्ञ बैठकीसाठी ऑनलाईन / ऑफलाईन उपस्थित राहतात.

(३) हे खरे आहे.

उपरोक्त अधिनियमातील कलम १४(४) नुसार संस्थेने अभ्यासक्रमनिहाय शुल्क संस्थेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणे बंधनकारक आहे. त्यानुषंगाने प्राधिकरणाने निर्धारित केलेले शुल्क संस्थेच्या संकेतस्थळावरील मुखपृष्ठावर प्रदर्शित करण्याच्या सूचना प्राधिकरणाकडून देण्यात आलेल्या आहेत.

(४) शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारणीबाबत हितसंबंधित घटक विद्यार्थी / पालक यांनी पुराव्यासह तक्रार दाखल केल्यास प्राधिकरण स्तरावर तक्रार निवारण समिती मार्फत चौकशी करण्यात येते. तक्रारीमध्ये तथ्य आढळल्यास संबंधितांविरुध्द अधिनियमातील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात येते. शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकांना अनुपस्थित असल्याची बाब संबंधित

सदस्यांच्या निदर्शनास आणून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठकींना उपस्थित राहता येईल, असे शुल्क नियामक प्राधिकरणाने दिनांक २७/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदस्यांना कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील पाझर तलावांतील गाळ काढून देखभाल दुरुस्ती व मजबूतीकरण करण्याबाबत

**(१४) ५६६६ (१४-१२-२०२५) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यात माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे तसेच सीना नदीच्या पुरामुळे जिल्ह्यातील ९१ पाझर तलावांना तडे गेले असून काही तलाव दुरुस्ती अभावी धोकादायक स्थितीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यात एकूण पाझर तलावांची संख्या किती आहे त्यापैकी किती तलाव पूर्ण क्षमतेने भरले आहेत याची तालुकानिहाय आकडेवारी काय आहे त्यापैकी किती तलाव धोकादायक स्थितीत असल्याचे शासनाच्या नोंदीत असून सोलापूर जिल्ह्यात मागील तीन वर्षांत पाझर तलावांच्या दुरुस्ती, मजबुतीकरण व गाळ काढणीसाठी संबंधित विभागामार्फत किती निधी मंजूर व वितरित करण्यात आला आहे,
(३) असल्यास, सीना नदीच्या पुरामुळे व अतिवृष्टीमुळे तडे गेलेल्या ९१ पाझर तलावांच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (०४-०२-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) सोलापूर जिल्ह्यात एकूण पाझर तलावांची संख्या ६७१ आहे. त्यापैकी ६२२ तलाव पावसाळ्यात पूर्ण क्षमतेने भरलेले होते. एकूण ६७१ पाझर तलांवापैकी अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या ४२ पाझर तलावांना दुरुस्ती आवश्यक असल्याबाबत प्रादेशिक कार्यालयाकडून माहिती प्राप्त झाली आहे. मागील तीन वर्षात पाझर तलावांच्या दुरुस्ती, मजबुतीकरण व गाळ काढणीसाठी रुपये १३१६.३९ लक्ष एवढा खर्च करण्यात आला आहे.
(३) अतिवृष्टीमुळे बाधित झाल्याने दुरुस्ती आवश्यक असणाऱ्या योजनांची अंदाजपत्रके क्षेत्रिय कार्यालयामार्फत तयार करण्यात आली असून त्यापैकी तातडीची दुरुस्ती आवश्यक असणाऱ्या योजनांची अंदाजपत्रके जिल्हा नियोजन समिती, सोलापूर यांचे कार्यालयास सादर करण्यात आली आहेत. निधीची उपलब्धता व क्षेत्रिय निकड विचारात घेऊन जिल्हा नियोजन समिती,सोलापूर यांचेमार्फत “सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६” अंतर्गत पाझर तलाव, सि.ना.बंधारे, को.प.बंधारे इत्यादी योजनांच्या दुरुस्तीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उध्दभवत नाही.

---

## राज्यातील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांना आगाऊ वेतनवाढ देण्याबाबत

**(१५) ५७७१ (१७-१२-२०२५) श्री.संदीप जोशी, श्री.संजय केणेकर, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ, श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांना दरवर्षी आदर्श शिक्षक पुरस्कार दिला जात असून हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झालेल्या शिक्षकांना एक आगाऊ वेतनवाढ देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४ पासून आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झालेल्या शिक्षकांना आगाऊ वेतनवाढ देण्यात आली नसल्याने सदर आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झालेले शिक्षक या वेतनवाढीपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झालेल्या शिक्षकांना ही आगाऊ वेतनवाढ न देण्याची कारणे काय आहेत, तसेच या आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झालेल्या शिक्षकांना सन २०१४ पासून प्रलंबित असलेली आगाऊ वेतनवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०६-०२-२०२६) :** (१)(२) व (३) राज्यात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांना दरवर्षी आदर्श शिक्षक पुरस्कार दिला जात असून शासन निर्णय दिनांक ०४ सप्टेंबर, २०१४ अन्वये सन २०१३-२०१४ पासून आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांना आगाऊ वेतनवाढीऐवजी रुपये एक लाख रक्कम अदा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई व पुणे येथील हाफकिन महामंडळातील कर्मचाऱ्यांचा दिवाळी बोनस प्रलंबित असल्याबाबत

**(१६) ६०८० (१४-१२-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व पुणे येथील हाफकिन महामंडळातील कर्मचाऱ्यांना देणी देण्यासाठी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी शासनाकडून रुपये २५ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असूनही, महामंडळाच्या व्यवस्थापनाने निधी उपलब्ध नसल्याचे कारण देत कर्मचाऱ्यांना हक्काचा दिवाळी बोनस न दिल्याने सदर कर्मचाऱ्यांनी महामंडळाच्या प्रवेशद्वारावर आंदोलन केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडे निधी उपलब्ध असूनही मुंबई व पुणे येथील हाफकिन महामंडळातील कर्मचाऱ्यांना देणी न देणाऱ्या महामंडळाच्या व्यवस्थापनाविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०२-०२-२०२६) :** (१) व (२) हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाच्या अधिपत्याखाली असलेल्या खरेदी कक्षाकडे उपलब्ध निधीपैकी रुपये २५ कोटी इतका निधी हाफकिन महामंडळ यांना bOPV लसीसाठी प्राप्त झालेल्या पुरवठा आदेशाची पूर्तता करण्याच्या अनुषंगाने कच्चा माल खरेदी करण्याकरीता अटी व शर्तींच्या अधीन राहून विभागाच्या शासन ज्ञापन, दिनांक १७/१०/२०२५ अन्वये मंजूर करण्यात आला आहे.

सदर निधी दिवाळी बोनस तसेच कर्मचाऱ्यांच्या देणी देण्यासाठी मंजूर केला नसून पोलिओ लसीच्या उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल खरेदीसाठी मंजूर केला आहे. दिवाळी बोनस मंजूर करण्याबाबत हाफकिन महामंडळातील पिंपरी पुणे विभागातील कर्मचारी यांनी आंदोलन केले होते. तथापि, आर्थिक वर्ष २०२४-२५ चा दिवाळी बोनस वाटप हा उत्पादनाशी निगडीत असून सदर आर्थिक वर्षात उत्पादन झाले नसल्याने महामंडळ तोट्यात असल्यामुळे दिवाळी बोनस न देण्याचा निर्णय घेण्यात आला.

सद्य:स्थितीत हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ आर्थिक उलाढाल वाढविण्यास प्रयत्नशील आहे. केंद्र शासनाकडून २५० कोटींचे पोलिओ लस पुरवठा आदेश प्राप्त झाले असून पोलिओ लस उत्पादन सुरु करण्यात आले आहे. तसेच, जळगाव विभागाचे उत्पादन सुरु करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिक्षक भरतीमध्ये ५० टक्के कपात करण्यात आलेली मागासवर्गीयांची पदे भरण्याबाबत

**(१७) ८५९५ (१७-०६-२०२१) श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षक भरती कृती समितीच्या नेतृत्वाखाली आझाद मैदान, मुंबई येथे दिनांक ११ फेब्रुवारी, २०२० रोजी बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यावेळी शिक्षक भरती कृती समिती शिष्टमंडळ आणि मा.ग्रामविकास मंत्री यांच्यात दिनांक १२ फेब्रुवारी, २०२० रोजी बैठक होऊन त्या बैठकीत मागासवर्गीयांची शिक्षक भरती प्रक्रिया आठ दिवसाच्या आत पूर्ण करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसून पन्नास टक्के कपात करण्यात आलेली पदे अद्यापही भरण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शिक्षक भरतीमध्ये ५० टक्के कपात करण्यात आलेली मागासवर्गीयांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०१-२०२६) :** (१), (२), (३), (४) व (५) शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०१७ च्या अनुषंगाने बिंदुनामावलीबाबत असलेला संभ्रम व काही संघटनांकडून प्राप्त होत असलेली निवेदने विचारात घेऊन, दिनांक २२/०२/२०१९ च्या शासन पत्रान्वये मागासवर्गीय उमेदवारांची ५० टक्के पदे कपात करण्याबाबत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने विविध संघटनांकडून सदरची कपात रद्द करणेबाबत मागणी होत आहे. याअनुषंगाने सदरची मागणी तपासून याबाबत यथोचित निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## पुण्यश्लोक कृषी प्रक्रिया सह. संस्था मर्या. जामखेड यांचे वाहतुकीच्या खर्चाची रक्कम मिळणेबाबत

**(१८) २१९९१ (०५-०१-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यश्लोक कृषी प्रक्रिया सह. संस्था मर्या. जामखेड यांचे सन २०१७-२०१८ मधील १२० कि.मी. पुढील वाहतुकीची रक्कम मिळणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.अल्पसंख्याक मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ११ ऑक्टोबर, २०२३ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (२७-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत विहित मर्यादेपेक्षा अधिकची वाहतूक मर्यादा पार केल्यानंतर मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीने याबाबत निर्णय घेऊन सदर बाब केंद्र शासनाकडे शिफारस करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने, मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीची बैठक दिनांक २४/०९/२०२५ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या कालावधीतील ५० किमी वरील वाहतूकीवर होणाऱ्या खर्चास मान्यता दिली आहे. सदर शिफारस दिनांक ०६/१०/२०२५ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या अखत्यारीतील नाफेड या नोडल संस्थेकडे शिफारस करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## घाटंजी, आर्णी, पांढरकवडा (जि.यवतमाळ) या तालुक्यातील नक्षलग्रस्त भागात कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना नक्षलग्रस्त भत्ता लागू करणेबाबत

**(१९) २३०७९ (२२-०७-२०२४) श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटंजी, आर्णी, पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील तालुक्यांमध्ये राखीव नक्षलग्रस्त भागात कार्यरत शासकीय कर्मचारी यांना नक्षलग्रस्त भत्ता लागू आहे परंतु खाजगी अनुदानित शाळेतील व नगरपरिषद शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नक्षलग्रस्त भत्ता लागू नसल्याचे माहे एप्रिल २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, असून तालुका घाटंजी,आर्णी, पांढरकवडा जिल्हा यवतमाळ येथील नक्षलग्रस्त भागात कार्यरत

खाजगी अनुदानित व नगरपालिका शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना नक्षलग्रस्त भत्ता लागू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१६-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.माहे जून २०२५ पर्यंत यवतमाळ जिल्ह्यात नक्षलग्रस्त म्हणून घोषित करण्यात आलेल्या घाटंजी, आर्णी व पांढरकवडा या तालुक्यातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नक्षलग्रस्त भत्ता देण्यात येत होता.तथापि, दिनांक २७/०६/२०२५ रोजीच्या गृह विभाग शासन निर्णयान्वये केवळ गडचिरोली व गोंदीया जिल्ह्यातील तालुके नक्षलग्रस्त भाग म्हणून घोषित केले आहेत. या पार्श्वभूमीवर माहे जूलै, २०२५ पासून सदर भत्ता बंद करण्यात आला आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात संच मान्यतेमध्ये विशेष शिक्षकांच्या पदे निर्मितीबाबत

**(२०) २४४१२ (२०-०२-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०२३-२४ च्या संच मान्यतेमध्ये विशेष शिक्षकांची पदे दर्शविण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२४-२५ च्या संच मान्यतेमध्ये विशेष शिक्षकांची पदे दर्शविण्यात येणार आहेत काय तसेच कार्यभार आणि विद्यार्थी पटसंख्या विचारात घेऊन विशेष शिक्षकांची पदे अतिरिक्त गणले जातील हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवीन शैक्षणिक धोरणामधील विशेष शिक्षकांच्या कार्याचे महत्त्व जाणून आणि आर टी ई मधील तरतुदींचा विचार करून विशेष शिक्षकांच्या अतिरिक्त पदनिर्मितीचा निर्णय केव्हा कार्यान्वित करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणतीही कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) शालेय शिक्षण विभागाचा दिनांक १५/०३/२०२४ च्या शासन निर्णयान्वये बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क अधिनियम, २००९ च्या अनुषंगाने सर्व व्यवस्थापनाच्या (स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय खाजगी अनुदानित, अंशतः अनुदानित इ. सर्व) नवीन शाळा सुरु करणे, वर्ग जोडणे त्याअनुषंगाने शाळांमधील संरचनात्मक बदल करणे आणि संच मान्यतेचे सुधारित निकष विहित करण्यात आले आहे. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासूनच्या संच मान्यता उक्त सुधारित निकषानुसार करण्यात येत आहेत.

शासन निर्णय दिनांक १५/०३/२०२४ अन्वये इ. ६ वी ते इ.८ वी व इ.९ वी ते इ.१०वी गटनिहाय विद्यार्थी संख्या विचारात घेवून विशेष शिक्षक (क्रीडा/कला/संगीत, कार्यानुभव/आयसीटी) मंजूर करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्याअन्वये शिक्षकांची पदे दर्शविण्यात येणार आहेत. तथापि, अतिरिक्त करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) व (५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.